# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
# नगर पथविक्रेता समिती निवडणूक 2024
## आरक्षण सोडत दि. 22/8/2024

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम 2016 नियम 14(2) अन्वये मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. 14 ऑगस्ट 2024 चे कार्यालयीन आदेशान्वये सोलापूर महानगरपालिका पथविक्रेता समितीची निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरिता माझी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**ज्याअर्थी,** पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील प्रकरण 4 (11) यामध्ये नगर पथविक्रेता समितीची रचना देण्यात आलेली आहे. पथविक्रेते प्रतिनिधी सदस्यांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्यांक, विकलांग व्यक्ती यांच्या योग्य प्रतिनिधीत्वासह एक तृतीयांश महिला विक्रेत्या असतील असे पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मध्ये नमूद आहे.

**ज्याअर्थी,** मा. आयुक्त तथा संचालक समन्वय अधिकारी फेरीवाला धोरण, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी दि. 13 एप्रिल 2023 चे परिपत्रकामध्ये पथ विक्रेता निवडणूकीसाठी आरक्षण सोडत करण्याची पध्दत नमूद केलेली आहे. पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील प्रकरण 4 (11) यामध्ये नगर पथविक्रेता समितीची रचना देण्यात आलेली आहे. यामध्ये पथविक्रेत्यांचे 8 सदस्य निवडणूकीद्वारे नियुक्त करण्यात यावेत. यामध्ये अनूसूचिती जाती – 1, अनुसूचित जमाती – 1, इतर मागासवर्ग – 1, अल्पसंख्यांक – 1, विकलांग व्यक्ती - 1 आणि खुला प्रवर्ग - 3 (एक महिला) असे नमूद आहे.

**त्याअर्थी,** महिलांसाठी आरक्षित ठेवण्याच्या 3 जागांपैकी उरलेल्या 2 महिला राखीव जागांसाठी अनूसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्यांक आणि विकलांग व्यक्ती या प्रवर्गामधून दि. 22/8/2024 रोजी दुपारी 3 वाजता, स्थायी समिती, सभागृह, सोलापूर महानगरपालिका येथे चिठ्ठी सोडतीद्वारा **अनुसूचित जमाती** व **विकलांग व्यक्ती** या जागा महिलांसाठी निश्चित झालेल्या आहेत व 1 जागा सर्वसाधारण महिलाकरिता थेट आरक्षित झालेली आहे. सोलापूर महानगरपालिका पथविक्रेता समितीची निवडणूक प्रक्रिया अंतर्गत 8 जागांसाठीं निश्चित झालेल्या आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | प्रवर्ग | संख्या | जागा |
|---|---|---|---|
| 1 | अनुसूचीत जाती | 1 | सर्वसाधारण |
| 2 | अनुसूचित जमाती | 1 | महिला राखीव |
| 3 | इतर मागासवर्ग | 1 | सर्वसाधारण |
| 4 | अल्पसंख्यांक | 1 | सर्वसाधारण |
| 5 | विकलांग व्यक्ती | 1 | महिला राखीव |
| 6 | सर्वसाधारण | 1 | महिला राखीव |
| 7 | सर्वसाधारण | 2 | सर्वसाधारण |
| | एकूण | 8 | |

22/8/24

(ज्योती भारती सुरेश भगत - पाटील)
निवडणूक निर्णय अधिकारी
पथविक्रेता समिती निवडणूक 2024
तथा सहा. आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर